# Work of Dhule Police

Dhule Police detected 112 property offences with chain snatcher gang in last four months and Organised Operation Muskan in Dhule District.



चार महिन्यातील कामगिरी : १ कोटी ४७ लाख रुपयांचा मुद्देमालही केला हस्तगत

# चोरी, घरफोडीचे ११२ गुन्हे उघडकीस

धुळे : गेल्या चार महिन्यात जिल्हाभरात घडलेले चोरीचे ८९ व घरफोडीचे २३ असे एकूण ११२ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलीस प्रशासनाला यश आले आहे. तसेच चोरीच्या गुन्ह्यातील ९६, तर घरफोडीच्या गुन्ह्यातील २६ अशा १२२ संशयितांना अटक करण्यात आली. या संशयितांकडून १ कोटी ४७ लाख २९ हजार ७९० रुपयांचा मुद्देमालही हस्तगत झाल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली आहे.

पोलीस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी धुळे जिल्हा पोलीस अधीक्षकपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर जिल्ह्यात ठिकठिकाणी घडलेले दरोडे, जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व्यूहरचना आखली होती.त्याला मिळालेले हे यश आहे.

जिल्ह्यात कुठेही मालमत्तेचे गुन्हे घडणार नाहीत यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रभारी अधिकाऱ्यांना रात्रीचे पेट्रोलिंग सक्तीची करण्यात आली आहे. बीट मार्शलची गस्तही वाढवली आहे. तपासणीसाठी पथके नेमण्यात आली आहेत. दिवसादेखील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनांद्वारे पेट्रोलिंग करण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्याची माहिती पोलीस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी दिली.

## मुस्कान ऑपरेशन यशस्वी

गृह मंत्रालयाच्या आदेशान्वये धुळे जिल्ह्यातही जुलै महिन्यात ऑपरेशन मुस्कान ही मोहीम हरवलेल्या मुलांच्या शोधासाठी राबविण्यात आली. या मोहिमेत पोलीस व महिला बालकल्याण विभागाने एकत्रितरीत्या काम करुन शहरासह जिल्ह्यात भटकणारे व भिक्षा मागणाऱ्या बेवारस मुलांचा शोध घेतला. या मोहिमेत १५ बालके सापडली. त्यांच्या पालकांचा शोध घेऊन ही बालके त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आली.

## सोनसाखळी लांबवणारी टोळी पकडली

धुळे शहरात दुचाकीवरुन धूम स्टाईलने महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी लांबवणारी वर्धा व जळगाव येथील आरोपींचा सहभाग असलेली टोळी स्थानिक गुन्हे शाखेने पकडली.

या टोळीकडूनही ९ गुन्हे उघडकीस आले आहेत. या टोळीतील ८ जणांना अटक झाली आहे. पोलिसांनी सोनसाखळी लांबवणाऱ्या चोरट्यांकडून २ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत झाला आहे.

**अवैध धंद्यांवर नजर**

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर पोलीस प्रशासनाची नजर असून सण-उत्सवाच्या काळात अवैध धंद्यांमुळे अनुचित प्रकार टाळण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गेल्या दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत जुगाराच्या २६८ केसेस करण्यात आल्या. त्यात २१३ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून ८ लाख ७० हजार ६४३ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. अवैधरीत्या दारु विक्री करणारे ४८२ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यात ७३ आरोपींना अटक झाली. त्यांच्याकडूनही १६ लाख ३७ हजार ९५५ रुपयांचा माल हस्तगत झाला. काही दिवसांपूर्वीच साक्री रोडवरील अरुणकुमार वैद्यनगर परिसरातील एका घरात बनावट दारुचा मिनी कारखाना उद्ध्वस्त करुन जितेंद्र टेकवाणी याला अटक झाली होती. तसेच मद्य तस्कर दादा वाणी उर्फ प्रवीण भालचंद्र वाणी यालाही मोहाडी पोलिसांनी अटक केली.